महाराष्ट्र पोलीस सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/12/2022 (मंगळवार) सायंकाळ

---

## मारहाण करून लुटमार करणाऱ्या टोळीतील मुख्य आरोपी गजाआड

## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कार्यवाही

नागपूर ग्रामीण हद्दीत दिनांक ०३/१२/२०२२ रोजी फिर्यादी नामे– विरेंद्र रामअवतार यादव, वय ५० वर्ष, रा. संताजी नगर वार्ड न ०५, रा. सैनीक कॅन्टीन च्या मागे कांन्द्री कन्हान यांनी पोलीस स्टेशन कन्हान येथे तोंडी रिपोर्ट दिली की, फिर्यादी याचा पानगे व चिकन विक्रीचा फिरत्या गाडीवरील ठेला असुन यातील आरोपी नामे– १) चोरवा उर्फ ईरफान शेख २) अमन खान ३) अमन कैथवार ४) नितिन खोब्रागडे ५) डिस्को विशाल व त्याचे तिन अनोळखी साथीदार सर्व रा कन्हान ता पारशिवनी या आरोपीतांनी फिर्यादीकडे खंडणी मागीतली ती देण्यास फिर्यादीने नकार दिल्याने आरोपीतांनी फिर्यादीला हाथबुक्कीने मारहाण केली व तसेच फिर्यादीस सोडण्यास आलेला फिर्यादीचा पुतण्या नामे–हिमांशु यादव यास जिवे ठार मारण्याच्या उदेशाने त्याला चाकुने वार करुन गंभीर जखमी केले तसेच फिर्यादीचे खिशातील रोख ३०००/– रुपये लुटुन नेले. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कन्हान अप क्र. ६९९/२२ कलम ३८७, ३९७ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयाचे समांतर तपासा दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने गुन्हयातील आरोपी शोध संबंधाने पोलीस स्टेशन कन्हान परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना सदर गुन्हयातील मुख्य आरोपी इरफान उर्फ चोरवा शेख यास सापळा रचून ताब्यात घेण्यात आले. विचारपूस दरम्यान त्याने सदरचा गुन्हा केल्याचे सांगितल्याने आरोपीची वैद्यकीय तपासणी करून पुढील कायदेशीर कारवाई करीता पोलीस स्टेशन कन्हान यांच्या ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले ना. ग्रा., यांचे मार्गदर्शनात स्थाानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक श्री. राजीव कर्मलवार, जितेंद्र वैरागडे, पोलीस हवालदार विनोद काळे, नाना राऊत, रोशन काळे, गजेंद्र चौधरी, पोलीस नाईक रोहन डाखोरे, विरेंद्र नरड, चालक पोलीस हवालदार ज्ञानेश्वर पाटील, अमोल कुथे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर